जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUL 2021
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या सात हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने अधिविभाग, संलग्नित महाविद्यालये, दूरशिक्षण केंद्राकडील पुनर्परीक्षेंतर्गत शुक्रवारी ८,३४६ पैकी ७,००९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या वतीने आज बी.ए.,बी.कॉम., एम.एस्सी.,बीबीए, बीसीए, एमसीए, एमएसडब्ल्यू, बी.व्होक, बी.टेक, बी.एस्सी., एम.एस्सी नॅनो सायन्स, एमबीए इन रुरल मॅनेजमेंट, जर्नालिझम अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUL 2021
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक यांची जयंती

**कोल्हापूर :** महाराष्ट्राच्या कृषिक्रांतीचे प्रणेते व माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 3 JUL 2021
सकाळ

## » अवतीभवती



टेंबलाईवाडी : शिवाजी विद्यापीठात वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस अभिवादन केल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत डावीकडून डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. व्ही. वाय. धुपदाळे, व्ही. टी. पाटील.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

टेंबलाईवाडी : महाराष्ट्राच्या कृषी क्रांतीचे प्रणेते आणि माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विधी अधिविभागाचे प्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.